दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००६/२०१७-१८
दि.१९/०१/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.सोहेल मु. खान, ...............अपिलार्थी
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
सहा.आयुक्त (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांचेकडे दि.०४/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मिरा भाईदर महानगरपालिका अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१) (ख) अन्वये १७ बाबींची माहिती प्रसिध्द करण्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याची आहे. त्या जबाबदार अधिकारीच्या संपुर्ण नाव, पद, कार्यालयीन पत्ता व दुरध्वनी क्रमांकासह माहिती उपलब्ध करुन मिळावी.

२) वरील नमुद माहिती कोणकोणत्या माध्यमातून प्रसिध्द केले जाते याबाबत तपशिलवार माहिती उपलब्ध करुन मिळावी. तसेच यापुर्वी प्रसिध्द केले गेलेल्या माहितीचा दिनांक किंवा तारीख याबाबत तपशिलवार माहिती उपलब्ध करुन मिळावी.

३) वरील नमुद माहिती कोणत्या स्वरुपाती उपलब्ध होते.

४) वरील नमुद माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी महानगरपालिकेचे कोणत्या अधिकाऱ्याची आहे. त्या जबाबदार अधिकारी यांचे संपुर्ण नाव, पद, कार्यालयीन पत्ता व दुरध्वनी क्रमांकासह माहिती उपलब्ध करुन मिळावी.

५) वरील नमुद माहिती उपलब्ध करुन देण्याऱ्या संबंधित माहिती अधिकारी यांचे संपुर्ण नाव, पद, कार्यालयीन पत्ता व दुरध्वनी क्रमांकासह माहिती उपलब्ध करुन मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती उपलब्ध करुन मिळविण्यासाठी विहित नमुन्यात विनंती अर्ज करुन सुध्दा मला कोणत्याही स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन दिली नसुन विनंती अर्ज नाकारण्यात आला. तरी अपिलार्थी अर्जदार यांचा अर्ज का नाकारण्यात आला याची स्पष्ट कारणे नमुद करुन खालील प्रमाने उपस्थित केलेल्या मुद्यांची मुद्देसुद महिती मिळणेकरिता अपिलार्थी यांनी दि.०९/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

अ) माझा अर्ज कोणत्या अधिका-याकडे केव्हा पोहोचला त्या अधिका-याकडे किती काळ तो अर्ज प्रलंबित राहिल आणि त्याने त्या कालावधी मध्ये काय काम केले (किंवा निर्णय घेतले).

ब) कृपया माझ्या अर्जावर निर्णय केले पाहिजे होते त्या अधिका-यांची संपुर्ण नाव, पद, कार्यालयीन पत्ता व दुरध्वनी क्रमांकासह माहिती उपलब्ध करुन मिळावी. तसेच ज्यांनी निर्णय केले नाही

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांनी सर्व विभागप्रमुखांकडून माहिती जमा करुन अपिलार्थी अर्जदारास १५ दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (सा.प्र.)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय.